स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या मानव्य विद्याशाखेतील
इतिहास विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेला
शोध - आराखडा

संशोधन विषय

सोलापूर जिल्ह्यातील अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान

संशोधक

श्री. शंकर गंगाधर कोमुलवार

एम. ए. बी. एड. सेट

संगमेश्वर महाविद्यालय सोलापूर, जि. सोलापूर

संशोधक मार्गदर्शक

प्रा. डॉ. विजय पांडुरंगराव कुलकर्णी

इतिहास विभाग प्रमुख

वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मे, २०१९

शोध - आराखडा

प्रस्तावना:

मानवी जीवनात इतिहासाला अनन्यसाधारण असे महत्व आहे. कारण इतिहासात मानवी जीवनाच्या समग्र वाटचालीचा आढावा घेतला जातो. इतिहास म्हणजे पूर्वी घडून गेलेल्या घटनांचे ज्ञान करुन घेणे, त्याची नोंद ठेवणे नव्हे, तर त्यांचा वर्तमानाशी संबंध जोडणे होय. इतिहास हा सत्याचा शोध आहे. सत्य हे स्वतंत्र मूल्य आहे. सत्य हे दुसऱ्या कोणत्याही मूल्यापेक्षा कनिष्ठ अथवा दुय्यम दर्जाचे असूच शकत नाही. म्हणून इतिहासामध्ये सत्यशोधन महत्वाचा घटक आहे. पूर्वी इतिहासाच्या अभ्यासामध्ये राजकीय बाजूंवर जास्त भर दिला जात होता. आता इतर घटकांनाही महत्व प्राप्त झाले आहे. उदा. सामाजिक,धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक इ.

आधुनिक काळात इतिहासाच्या सुक्ष्म अभ्यासामुळेच इतिहास अभ्यासाचे नवनवीन प्रवाह निर्माण झाले आहेत. इतिहास लेखनाच्या विविध प्रवाहांमध्ये आंग्लवादी, राष्ट्रवादी, प्राच्यविद्यावादी, मार्क्सवादी, सबाल्टन इ. इतिहास लेखनप्रवाह निर्माण झाले आहेत. त्याचबरोबर आज इतिहासामध्ये स्थानिक इतिहासलाही अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे. याच स्थानिक इतिहासाचा एक महत्वाचा भाग म्हणून सोलापूर जिल्ह्यातील अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान याविषयावर प्रकाश टाकण्याचा प्रयास आहे.

शिक्षण हे समाजप्रबोधनाचे अत्यंत महत्वाचे साधन मानले जाते. भारतामध्ये प्राचीन काळापासून शिक्षणाची मोठी परंपरा आहे. प्राचीन काळातील गुरुकुले ही भारतीय शिक्षण संस्थेचे महत्वाचे वैशिष्ट्य मानले जाते. पांडुरंगशास्त्री आठवले असे म्हणतात की, ‘शिक्षण म्हणजे मानवी जीवनातील सुप्त गुणांचे

प्रकटीकरण होय.’ प्राचीन काळात नालंदा, विक्रमशीला, वल्लभी यासारख्या महत्वाच्या शिक्षण संस्था अस्तीत्वात होत्या. कालांतराने शिक्षण हे विशिष्ट वर्गापुर्ते मर्यादित राहिले. आधुनिक काळात ब्रिटीशांनी भारतात सत्ता स्थापन केल्यानंतर आपली ब्रिटिश शिक्षणप्रणाली दृढ केली. विशेषतः लॉर्ड मेकोले शिक्षण पद्धती आजदेखील पाहायला मिळते. स्वातंत्र्यपूर्वकाळात हंटर आयोगापासून ब्रिटीशांनी शिक्षणात बदल घडवून आणण्यास सुरुवात केली. तर स्वातंत्र्यानंतर राधाकृष्णन आयोगापासून ते आजपर्यंत शिक्षणात आमुलाग्र बदल झालेले आहेत. शिक्षणाचा प्रसार आता खेड्या-पाड्यापर्यंत झालेला आहे. समाजातील वंचित, बहुजन, दलित, अल्पसंख्यांक अशा सर्व घटकापर्यंत आज शिक्षण पोहचले आहे.

सदर संशोधनामधून ‘सोलापूर जिल्ह्यातील अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान’ यावर संशोधन करून सोलापूर जिल्ह्यातील या वंचित घटकापर्यंत शिक्षण कशाप्रकारे प्रसारित झाले आणि समाजाचा विकास कशाप्रकारे होत गेला याचा समग्र आढावा घेतला जाणार आहे.

- **संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये:**

१. सोलापूर जिल्ह्याची एतिहासिक व शैक्षणिक पार्श्वभूमी अभ्यासणे.

२. सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांचे योगदान स्पष्ट करणे.

३. अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांचे शैक्षणिक विकासाचे टप्पे अभ्यासणे.

४. अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांमुळे समाजात झालेल्या परिवर्तनाचा आढावा घेणे.

५. अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांचे सामाजिक व सांस्कृतिक कार्याची नोंद घेणे.

६. अल्पसंख्यांक शिक्षण विषयक राजकीय धोरणांचे अवलोकन करणे.

- **संशोधन विषयाची आवश्यकता:**

सोलापूर जिल्हा हा बहुभाषिक व बहुधर्मीय जिल्हा आहे. या जिल्ह्याला लागूनच कर्नाटक आणि तेलंगणा ही दोन राज्ये अतिशय जवळची आहेत. त्यामुळे या दोन राज्यांचा सोलापूर जिल्हयावर प्रभाव पडला आहे. सोलापूर शहरात पद्मशाली, वीरशैव, आर्य समाज, जैन, ख्रिस्ती, मुस्लिम या समाजातील घटक मोठ्या प्रमाणात पहायला मिळतात. समाजातील हा घटक शिक्षणापासून वंचित वा दुर्लक्षित होता. अशा घटकाला प्रावाहात आणण्यासाठी काही शिक्षण संस्थांनी शिक्षण प्रसाराचे महत्वपूर्ण कार्य केले आहे. अशा शिक्षण संस्थांचे या समाजासाठी त्यांनी केलेले योगदान याचा सूक्ष्म अभ्यास करून समाजासमोर मांडणे आवश्यक वाटते. सदर संशोधनाचा अभ्यास लोकांना, सरकारला व सामाजिक संस्थांना उपयुक्त ठरणार आहे.

- **संशोधनाची गृहीतके:**

संशोधन कार्य यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी संशोधनामध्ये विधान मांडावे लागते याच विधानाच्या आधारे संशोधनाचे अनुमान काढता येईल. या संशोधनामध्ये खालीलप्रमाणे काही गृहीतके मांडण्यात आलेली आहेत.

१. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात सोलापूर जिल्ह्यात अनेक अल्पसंख्यांक शिक्षण संस्था स्थापन करण्यासाठी काही नेतृत्वानी परिश्रम घेतले

२. विविध नेत्यांच्या या परिश्रमामुळे वंचितांना शिक्षणाच्या प्रवाहात सामील होण्यास मदत झाली.

३. शिक्षण प्रसारामुळे वंचित घटकांचे प्रबोधन घडून आले.

४. शिक्षण प्रसारामुळे अल्पसंख्यांक समाजतील वेटबिगारी, बालमजुरीच्या प्रमाणात घट झाली.

५. अल्पसंख्यांक समाजतील स्त्री शिक्षणाच्या प्रमाणात वाढ झाली.

६. अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांमुळे सोलापूर जिल्ह्यात सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाला गती मिळाली

७. अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांमुळे समाजातील वंचित घटकातून काही प्रभावी नेतृत्वे उदयास आली.

८. अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांमुळे समाजातील वंचित घटकांमध्ये वैज्ञानिक व विवेकवादी दृष्टीकोण उदयास आला.

९. अल्पसंख्यांकातील शिक्षण प्रसारामुळे या समुहाचा समाजाच्या सर्वांगीण क्षेत्रात (राजकारण, उद्योग) प्रवेश होण्यास मदत झाली.

- **संशोधन पद्धती:**

प्रबंधाच्या लेखनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा उपयोग केला जाणार आहे. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांचे वर्णनात्मक, विश्लेषणात्मक व संख्यात्मक पद्धतीने संशोधांनाची मांडणी केली जाणार आहे. संशोधांनासाठी मराठी, हिन्दी, इंग्रजी, उर्दू, कानडी, तेलुगू भाषेतील संदर्भग्रंथांचा व नियतकालिके, वृत्तपत्रे इत्यादींचा व अन्य प्राथमिक साधनांचा आधार घेतला जाणार आहे. या शिवाय क्षेत्रभेट व मुलाखत पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे.

- **प्रकरणांची वर्गवारी:**

१. विषयप्रवेश

२. सोलापूर जिल्ह्याची एतिहासिक पार्श्वभूमी

३. सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था

४. सोलापूर जिल्ह्यातील भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था

५. सोलापूर जिल्ह्यातील अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांचे सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान

६. उपसंहार

- **संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा:**

प्रस्तुत संशोधन हे सोलापूर जिल्हयाशी संबंधित आहे या संशोधनातून सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या जवळ - जवळ साठ ते सत्तर वर्षांचा कालखंड अभ्यासासाठी निवडला आहे. संशोधनातून समग्र शैक्षणिक संस्थाएवजी केवळ अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांवर प्रकाश टाकणार आहे. तसेच सादर संशोधांनासाठी केवळ सोलापूर जिल्ह्याची निवड केली आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांविषयी संशोधन ही संशोधन विषयाची व्याप्ती आहे. तर केवळ सोलापूर जिल्हा व केवळ अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था हीच या संशोधांनाची मर्यादा आहे.

- **आजवर झालेल्या संशोधनाचा आढावा (संशोधन विषयाचे वेगळेपण):**

सोलापूर शहर व जिल्हयावर विविध अंगातून संशोधन झालेले आहे. राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, पर्यटन अशा विविध दृष्टीकोणातून संशोधन झालेले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील सोलापूर जिल्ह्यातील शैक्षणिक चळवळी व सोलापूरचा शैक्षणिक विकास यावर प्रकाश टाकला आहे. परंतु सोलापूर जिल्ह्यातील अल्पसंख्यांक शिक्षण संस्थांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान यावर आजतागायत संशोधन झालेले नाही. सदर संशोधनातून समाजासमोर नवी माहिती मांडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

- **संशोधन विषयाचे महत्व:**

सदर संशोधनामुळे सोलापूर जिल्ह्यातील अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थांनी केलेल्या शिक्षण प्रसारामुळे व्यापक प्रमाणात सकारात्मक सामाजिक परिवर्तन. घडून आले तसेच शिक्षणातून प्रभावी नेतृत्वांचा उदय झाला व सोलापूर जिल्ह्याच्या विकासाला एक वेगळी दिशा मिळाली. या संशोधांनात्मक अध्ययनाचा उपयोग स्थानिक पातळीवर याशिवाय तालुका, राज्य, आणि केंद्र सरकारला उपयुक्त ठरणार आहे व वंचित घटकाच्या शैक्षणिक विकासातील इतिहासाची पोकळी भरून काढणारी ठरणार आहे.

- **संदर्भसुची:**

१.शैक्षणिक संस्थांचे वार्षिक अहवाल

२.मुलाखती

३. प्रश्नावली

४.गेझेटियर्स

५. वृत्तपत्रे

६. मासिके

७. अप्रकाशित संशोधन प्रबंध

८. सोलापूर नगरपालिका निर्देश ग्रंथ

९. स्मृति ग्रंथ

१०. सरकारी कागदपत्रे

११. खाजगी कागदपत्रे

१२. इतर दुय्यम साधने. इ.

संशोधक | **मार्गदर्शक**

श्री शंकर गंगाधर कोमुलवर | **प्रा. डॉ. विजय पांडुरंगराव कुलकर्णी**